**संचालनालय, लेखा व कोषागारे, नवीन शासकीय कुटीर क्र.१५ व १६,प्लॉट क्र.१७६,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग,**
**मुंबई ४०० ०२१**

# नवीन निवृत्तीवेतन प्रणालीबाबत सूचना

सर्व कोषागार अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, माहे एप्रिल २०१२ पासून नवीन निवृत्तीवेतन प्रणाली लागू करण्यात येणार आहे. सदर प्रणालीबाबत आवश्यक असणारे प्रशिक्षण जिल्हा कोषागारनिहाय आयोजित करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे सदर प्रणालीमध्ये प्रवेश करण्यासाठी यापूर्वीच निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये लॉगईन झाल्यानंतर पेन्शन क्लर्क , इनवर्ड क्लर्क, पेन्शन ऑडिटर, अप्पर कोषागार अधिकारी / सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी यांची माहिती संकलित करण्यात आलेली आहे. सदर प्रणालीमध्ये नोंदविलेल्या माहितीनुसारच (Employee Code) लॉगईन करावे व प्रथमतः लॉगईन करताना सदर (Employee Code) व पासवर्ड म्हणून त्याची ifms१२३ टाकण्यात यावी.

प्रत्येक कोषागार अधिकाऱ्यांनी मार्च २०१२ देय एप्रिल २०१२ ची निवृत्तीवेतन देयके दोन्ही प्रणालीतून संस्करीत (Processing) करुन कोषागारास सादर करावीत. ज्या कोषागार कार्यालयांनी दोन्ही प्रणालींवर निवृत्तीवेतन देयक संस्करीत (Processing) करुन या कार्यालयास अहवाल सादर केला नसेल अशा कोषागार कार्यालयांनी यानंतर येणाऱ्या अडचणींबाबत दखल घेतली / विचार केला जाणार नाही.